महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.वैशिप्र-१०२५/प्र.क्र.४२/एसईबीसी-ओबीसी/जा.वै.प्र/सुचना/९६८ दिनांक : ०९/०५/२०२५

# महत्वाची सुचना

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वैद्यकीय /आयुष व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी सादर करावायाच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ - सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०२/०५/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. **त्यानुसार सदरील उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०१/०८/२०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.**

वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप पर्यंत प्रवेशित महाविद्यालयात जमा/अपलोड केले नाही अशा सर्व उमेदवारांना पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे -

१) ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे, अशा उमेदवारांनी त्यांचे मूळ जात वैधता प्रमाणपत्र त्यांचे प्रवेशित महाविद्यालयात तात्काळ जमा करावे.

२) तसेच ज्या उमेदवारांना अद्याप पर्यंत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून प्राप्त झालेले नाही अशा उमेदवारांनी संबंधित जिल्हा पडताळणी समितीकडून आपले जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०१/०८/२०२५ पुर्वी प्राप्त करुन घेण्यात यावे आणि प्राप्त होताच प्रवेशित महाविद्यालयात जमा करावे.

३) विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन संबंधित महाविद्यालयात जमा न केल्यास उमेदवाराचा प्रवेश रद्द होवू शकतो याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

### महाविद्यालयांकरीता सूचना -

१) महाविद्यालयाने एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून जात वैधत प्रमाणपत्राच्या पावतीच्या आधारे ज्या उमेदवारांना प्रवेश दिला आहे अशा उमेदवारांकडून त्यांचे मूळ जात वैधता प्रमाणपत्र विहित कालावधीत जमा करुन घ्यावे व सदर प्रमाणपत्र महाविद्यालयाने कॉलेज फिडबॅक पोर्टलमध्ये महाविद्यालयाचे लॉगीनद्वारे तात्काळ अपलोड करावे. (प्रमाणपत्र अपलोड करण्याबाबतची कार्यपध्दती स्वतंत्र ई-मेलद्वारे महाविद्यालयास कळविण्यात येईल.)

२) ज्या, उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयामध्ये जमा केले असेल तर सदर महाविद्यालयाने कॅप पोर्टलमध्ये सदर प्रमाणपत्र अपलोड केले आहे की नाही याबाबत खातरजमा करावी व अपलोड केलेले नसल्यास तात्काळ अपलोड करावे.

३) महाविद्यालयाने आपल्याकडे एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून प्रवेशित सर्व उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र असल्याची खातरजमा करावी व वरील प्रमाणे कार्यवाही करावी. तसेच सदर सूचना संबंधित उमेदवारांचे तात्काळ निर्दशनास आणावी.

वरीलप्रमाणे अधिकच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या उमेदवारांचे प्रवेशाबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची सर्व संबधित उमेदवार व शैक्षणिक संस्था यांनी नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष
महाराष्ट्र राज्य, मुंबई